## नि.दि.मु.नं.१०२/२०१३ निशाणी क्र. ६६ खालील आदेश

(श्रीमती ऊषा भिकु सोडमिसे विरुध्द हनुमंत भिकु सोडमिसे वगैरे)

सदर दाव्याचे कामी वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी नं.१ हनुमंत भिकु सोडमिसे यांचेविरुध्द दावा अपशम (Abate) चा आदेश रद्द होवून मिळण्यासाठी दाखल केला आहे. अर्जासोबत प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

२. वादीचे थोडक्यात कथन असे की, दाव्यातील प्रतिवादी हनुमंत भिकु सोडमिसे हे वेदांत मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल, पुणे येथे दि. ०१.११.२०२३ रोजी मयत झाले. वादीचे वारस हे मुदतीमध्ये रेकॉर्डवर न आल्यामुळे दावा हा प्रतिवादी क्र.१ विरुध्द ॲबेट झाला आहे म्हणून सदरचा अर्ज हा प्रतिवादी क्र.१ विरुध्द झालेला दावा अपशम (Abate) आदेश रद्द होवून मिळणेसाठी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी प्रस्तुतच्या अर्जास त्यांचे म्हणणे दाखल केले नाही. म्हणून प्रस्तुतचा अर्ज हा विना म्हणणे चालविणेत आला.

४. वादी यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले.

५. मयत प्रतिवादी क्र.१ हनुमंत भिकु सोडमिसे यांचा मृत्यू दाखला यादी नि.६५ दाखल केला आहे. सदर कागदपत्रांचे अवलोकन केल असता प्रतिवादी क्र.१ हे दि. ०१.११.२०२३ रोजी मयत झालेचे दिसून येते. प्रतिवादी क्र.१ हे दावा प्रलंबीत असताना मयत झालचे दिसून येते. वादींनी प्रस्तुत दावा हा प्रतिवादी विरुध्द दावा मिळकतीचे वाटप होवून मिळणेसाठी तसेच दि. १२.०३.२०१३ रोजीचे खरेदीखत हे बंधनकारक नाही असा जाहिर ठराव होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. तथापि, दावा प्रलंबीत असताना प्रतिवादी क्र.१ हनुमंत भिकु सोडमिसे यांचे निधन झाल्याने त्यांचे वारस अभिलेखावर आणणे आवश्यक होते. वादीचे वारस मुदतीत अभिलेखावर न आणल्यामुळे प्रस्तुत दावा हा तांत्रीकदृष्ट्या अपशम झाला आहे. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज हा २ महिन्यांनी दाखल करण्याचे कोणतेही संयुक्तिक कारण नमुद केलेले नाही. मयत प्रतिवादी क्र.१ यांचे वारस अभिलेखावर आणणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक व

गरजेचे आहे, कारण प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादी विरुध्द वाटपासाठी व जाहिर ठरावासाठी दाखल केला आहे. भविष्यात मुळ प्रतिवादी क्र.१ यांच्या वारसांची तक्रार राहू नये म्हणून वारसांना अभिलेखावर घेणे आवश्यक व गरजेचे आहे. याउलट तसे न केलेस मयत प्रतिवादीच्या वारसांचे दावा मिळकतीतील हक्क ठरविता येणार नाहीत. त्यामुळे प्रतिवादीचे वारस अभिलेखावर घेतलेस ते दोन्ही पक्षकारांच्या हिताचेच ठरेल. सबब प्रतिवादी विरुध्द झालेला अपशमचा आदेश रद्द करुन वादी व प्रतिवादी यांचेमधील वाद कायमस्वरुपी संपुष्टात आणणेस त्याची निश्चितपणे मदतच होणार आहे. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादींचा अर्ज नि.६६ हा मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१ यांचेविरुध्द झालेला अपशमचा आदेश हा रद्द करण्यात येतो.

PANKAJ HILAL PATIL

Digitally signed by PANKAJ HILAL PATIL
DN: cn=PANKAJ HILAL PATIL, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6950436, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2024.12.10 17:31:48 +0530

**फलटण** **( श्री. पी. एच. पाटील )**

**दि. १०.१२.२०२४** **४ थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, फलटण**